।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION

**Phone: (02462) 229542**
**Fax : (02462) 229574**

**Website: www.srtmun.ac.in**

**E-mail: bos.srtmun@gmail.com**


सर्व संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाचालक/ सचिव व प्राचार्य यांच्या दि.२८.११.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्ताच्या अंमलबजावणीबाबत.

## प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, **दिनांक २८.११.२०१९ रोजी संपन्न झालेल्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाचालक/सचिव व प्राचार्य यांच्या बैठकीचे इतिवृत्त** सोबत जोडले आहे. कृपया त्यानुसार अंमलबजावणी करावी.

सदरील परिपत्रक व बैठकीचे इतिवृत्त प्रस्तुत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:** शैक्षणिक–१/परिपत्रक/संस्थाचालक–सचिव व प्राचार्य यांची दि.२८.११.२०१९ रोजीची बैठक/२०१९–२०/**२०७९**
**दिनांक** : ०३.१२.२०१९.

स्वाक्षरित/–
**उपकुलसचिव**
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) साहाय्यक कुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) सीनिअर प्रोग्रामर, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे मा.अध्यक्ष/सचिव व मा.प्राचार्य यांची दिनांक २८ नोव्हेंबर २०१९ रोजी अधिसभा सभागृहात आयोजित बैठकीचे इतिवृत्त

---

दिनांक : २८.११.२०१९

मा.कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी आयोजित प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सकाळी ११.०० वाजता सर्व संलग्नित महाविद्यालयांचे मा.अध्यक्ष/सचिव व मा.प्राचार्य यांची बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीच्या सुरूवातीस प्रस्तुत विद्यापीठाचे मा. कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे यांनी बैठकीकरीता उपस्थित सर्वांचे स्वागत करून प्रस्तावनामध्ये म्हणाले की, विद्यापीठाचे व महाविद्यालयांचे कार्य एकमेंकावर अवलंबून असतात ते सहज, सोप्या पध्दतीने पार पाडावीत तसेच शैक्षणिक गुणवत्ता वाढीकरीता एका महाविद्यालयाने प्रयत्न करून चालणार नाही तर सर्व महाविद्यालय, विद्यापीठ या सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे, त्याशिवाय शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होणार नाही असे म्हटले.

मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापीठाची भूमिका ही संलग्नित महाविद्यालयास वेळावेळी मार्गदर्शन, मदत करणे अशीच आहे, कुठल्याही प्रकारची पोलिसींग करणे ही नाही, असे स्पष्ट केले. विद्यापीठाचे कार्य फक्त परीक्षा फॉर्म घेणे, निकाल लावणे, ॲफिलेशन देणे इत्यादी पुरतेच मर्यादीत न राहता संलग्नित महाविद्यालयाचे शैक्षणिक संशोधन व Extension Activities ला मदत करणे जेणे करून महाविद्यालया बरोबरच विद्यापीठाचा विकास करणे ही आहे. बऱ्याच वेळेस विद्यापीठाची एखादी रास्त भूमिका असते त्या रास्त भूमिकेस महाविद्यालयाकडून म्हणावा तसा योग्य प्रतिसाद मिळत नाही.

**मा. कुलगुरू महोदयांनी खालील बाबींवर सूचित केले व त्याची अंमलबजावणी चांगल्यापध्दतीने करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच संबंधीत प्राचार्यांनी सर्व शिक्षकांची बैठक घेवून खालील विषयांची माहिती सर्वांना दयावी.**

| | |
|---|---|
| ०१ | परीक्षा पेपर तपासणी, परीक्षा निकाल वेळेवर लावणे आणि शिक्षकांचा पेपर तपासण्यात सहभाग. |
| | • सर्व प्राचार्य, संस्था अध्यक्ष/सचिव यांनी परीक्षेचे कामकाज वेळेवर व अचूकपणे होण्याकरीता शिक्षकांना परीक्षा कामाकरीता पाठविण्यात यावे, जे शिक्षक परीक्षा कामकाजामध्ये सहभागी होणार नाहीत त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल, असे मा. कुलगुरू महोदयांनी सूचित केले.<br>• आपल्या महाविद्यालयास किती पेपर तपासणीसाठी दिले होते. कोणकोणत्या शिक्षकांनी किती पेपर तपासले यांची माहिती बिलासोबत पाठवावी. सदर माहिती विद्यापीठास उपयुक्त आहे.<br>• शिक्षकांनी डी—कॅप मध्ये किती पेपर तपासले याची देखील माहिती |

| | |
|---|---|
| | डी—कॅप कडून घ्यावी व सदर माहिती विद्यापीठास दयावी. |
| ०२ | स्थानिक चौकशी समिती भेट, संशोधन केंद्र आणि शैक्षणिक व प्रशासकीय समित्या. |
| | • महाविद्यालयात काही उणिवा असल्यास त्यापूर्ण करण्याकरीता त्या महाविद्यालयास ०१—०२ वेळा संधी देण्यात येईल आणि सदर महाविद्यालयास संधी देवूनही त्यात सुधारणा होत नसतील तर त्या महाविद्यालयास D-Affiliaction करावे लागेल, असे सूचित केले.<br>• LIC च्या भेटी प्रसंगी त्या समितीस महाविद्यालयांनी सहकार्य करावे.<br>• प्रत्येक महाविद्यालयांने CDC (College Development Committee) and ICC (Internal Complaint Committee) ची स्थापना महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम—२०१६ प्रमाणे करावी, असे सूचित केले. |
| ०३ | शैक्षणिक बाबींबाबत. |
| | • ज्यावेळेस महाविद्यालय Accrediation करीता जातात तेव्हा Accrediation करून प्रमाणपत्र घेणे एवढेच मर्यादीत न राहता आपल्या महाविद्यालयाचा खरोखरच शैक्षणिक विकास व्हावा यासाठी प्रयत्न करावेत.<br>• Accrediation ही एक फक्त प्रक्रिया न राहता शैक्षणिक दर्जा वाढीवणारी असावी.<br>• शिक्षक महाविद्यालयामध्ये किती तास घेतात, किती वेळ Campus मध्ये राहतात हे युजीसी नियमाप्रमाणे पाहण्याची जबाबदारी प्राचार्यांची आहे.<br>• महाविद्यालयामध्ये संशोधनाकरीता मुलभूत गोष्टी / सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी संस्थेची आहे.<br>• प्रस्तूत विद्यापीठामधील सायन्स संकुलातील Instrument संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थ्यांना वापरावयाचे असतील तर त्यांनी प्राचार्यांच्या सहीचे पत्र घेवून शिक्षक, विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकुलात यावे.<br>• विद्यापीठातील Sport Facilities चा उपयोग संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थ्यांनी घ्यावा.<br>• विद्यापीठामधील Competitive Centre, SC/ST and Net/Set Civil Services या Centre चा लाभ संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घ्यावा, याकरीता उन्हाळी व दिवाळी सुट्टी मध्ये त्याचे विशेष शिबीर घेण्यात येतील सदर शिबीरामध्ये मार्गदर्शनाकरीता विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत, असे आवाहन केले. |
| ०४ | परीक्षा घेणे, पेपर तपासणे व पेपर मॉडरेशन प्रक्रियेबाबत प्राचार्यांचे मत/ सहमती... |
| | • परीक्षा पध्दतीबाबत काही धोरण असल्यास त्याबाबत आपल्या सूचना (Suggestions) सर्वांनी विद्यापीठास दयावेत. |

| | |
|---|---|
| | • आगामी काळामध्ये सायन्स इ. परीक्षेचे ऑनस्क्रीन असेंसमेंट करण्यात येणार आहेत.<br>• एका कॉलेजला एकाच विद्याशाखेचे ऑनस्क्रीन केंद्र देण्यात येणार आहे.<br>• ज्या महाविद्यालयामध्ये परीक्षा घेण्यात येतात त्याच महाविद्यालयामध्ये असेंसमेंट व मॉडरेशन ठेवण्यात यावे. इतर महाविद्यालयांनी आपल्या शिक्षकांना असेंसमेंट व मॉडरेशनकरीता त्या महाविद्यालयात पाठविण्यात यावे. याबाबत सर्वांनी आपापल्या सूचना (Suggestions) दयाव्यात. |
| ०५ | मुल्यांकन पध्दतीमध्ये बदल करण्यासाठी खालील मुद्यावर सूचना (Suggestions) मागितल्या आहेत. |
| | • परीक्षा पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल करण्याची गरज आहे.<br>• प्रत्येक सेमीस्टरला ०४—०५ विषय असावेत. प्रत्येक विषय हा १०० मार्क्सचा असावा. त्यामध्ये २० मार्क्सचे मिड सेमीस्टर असेंसमेंट असावे. ८० मार्क्सची अंतिम परीक्षा असावी. २० मार्क्सच्या परीक्षा मध्ये शिक्षकांनी त्यांच्या पध्दतीने परीक्षा घ्यावीत. ८० मार्क्सच्या परीक्षा मध्ये फक्त ०४ प्रश्न असावेत त्यामध्ये पहिला प्रश्न हा अनिवार्य असावा. पहिला प्रश्न हा संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असावा. प्रश्न क्रमांक ०२ हा थेअरी किंवा न्युमरीकल स्वरूपात असावा. जेथे न्युमरीकल पध्दतीने प्रश्न देता येत नाही तेथे केस स्टडी देण्यात यावी. याबाबत सर्वांनी आपापल्या सूचना (Suggestions) दयावेत.<br>• अभ्यासक्रम बदलत असतांना अभ्यासक्रम शिकण्याचा उद्देश काय आहे याची माहिती विद्यार्थ्यांना दयावी. |
| ०६ | नॅक मान्यतेच्या स्थितीबाबत. |
| | • प्रस्तुत विद्यापीठातील अनुदानित १२ महाविद्यालयांनी नॅकला अप्लाय केला आहे, तरी सर्व संलग्नित अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांनी NAAC ला अप्लाय करावा. या सर्व महाविद्यालयांना विद्यापीठातर्फे सर्व प्रकारची मदत करण्यात येईल. विद्यापीठामध्ये २० ते २५ शिक्षक हे NAAC बाबत मार्गदर्शन करण्यास तयार असून त्याचा लाभ घ्यावा. |
| ०७ | पीएच.डी. संशोधन केंद्राबाबत. |
| | • पीएच.डी. संशोधन केंद्रास LIC कमिटीची भेट होईल. त्या संशोधन केंद्रामध्ये युजीसीच्या नियमाची अंमलबजावणी होते की नाही ही कमिटी पाहणार आहे. युजीसी नियमांची अंमलबजावणी होत नसल्यास त्याबाबत LIC कमिटी मार्गदर्शन करेल. नियमांचे पालन होत नसल्यास संशोधन केंद्र बंद करण्यात येईल. याबाबत LIC कमिटीच्या भेटी हया दर ०२ वर्षानी होत राहतील.<br>• संशोधन हे दर्जेदार असावेत, संशोधनाचा उपयोग समाजासाठी व्हावा. |

| | |
|---|---|
| | • संशोधनाचे ०६ महिन्याचे सर्व रिपोर्ट एकाच वेळी जमा करून घेवू नयेत. दर सहा महिन्याचे रिपोर्ट त्या—त्या वेळीच घ्यावेत.<br>• प्रत्येक वर्षी संशोधक विद्यार्थ्यांचा Annual Progress Seminar असावा. सदर सेमीनार घेण्याकरीता प्राचार्यांनी एक समिती गठित करावी. त्या समितीमध्ये विभाग प्रमुख—अध्यक्ष, मार्गदर्शक—सदस्य, महाविद्यालयातील त्या विषयातील तज्ञ—सदस्य अशा समिती समोर विद्यार्थ्यांचा Annual Progress Seminar व्हावा. समितीचे सूचना (Suggestions) पुढच्या वर्षीच्या सेमीनार मध्ये पुर्ण केल्या पाहिजे.<br>• सर्व कामकाज झाल्यानंतर त्या संशोधक विद्यार्थ्यांचा Pre-Synopsis होईल त्यावेळी पीजी कमिटी ने शिफारस केल्याने पुढील कार्यवाही होईल. |
| ०८ | राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम : एक महाविद्यालय व एक गांव दत्तक योजनेबाबत. |
| | • एन.एस.एस. चे कार्य फक्त औपचारीक न राहता ते चांगल्या पध्दतीने व्हावे.<br>• भारताचे ''उन्नत भारत अभियान'' सर्व महाविद्यालयांनी यशस्वीरीत्या राबावावे.<br>• सर्व महाविद्यालयांनी एक गाव तीन वर्ष कालावधीसाठी दत्तक घ्यावे. सदर कालावधीमुळे गावाचा दृष्टिस दिसेल असा विकास होवू शकेल, ज्याचे समाधान खुप मोठे आहे.<br>• ''एक भारत श्रेष्ठ भारत'' ही केंद्र सरकारची नविन योजना आहे. या योजने अंतर्गत आपल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ने ओरिसा राज्यातील बऱ्हारपूर हा जिल्हा घेतला आहे. सदर जिल्हयास आपल्या विद्यापीठातर्फे ५० विद्यार्थी पाठविण्यात येणार आहे. तसेच तेथील ५० विद्यार्थी आपल्याकडे येणार आहेत. सदर कामाकरीता प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील चांगल्या विद्यार्थ्यांची शिफारस करावी. जेणे करून हे ५० विद्यार्थी ओरिसा येथील इतंभूत माहिती इतर १० विद्यार्थ्यांना देतील. |
| ०९ | विद्यार्थ्यांना शिक्षित करण्याबाबत. |
| | • विद्यार्थ्यांवर शिक्षकांचा प्रभाव फार मोठा असतो. शिक्षकांचे वागणे, बोलणे, वैशिष्टये हे विद्यार्थ्यांसाठी Roll Model असते. त्या सर्वांचा प्रभाव विद्यार्थ्यांवर होतो.<br>• शिक्षकांच्या सर्व गुण कौशल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विषयाप्रती आवड निर्माण होते. अशी आवड सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याकरीता प्रयत्न करावेत.<br>• सर्व प्राचार्य व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना NPTEL / MOOC /SWAYAM चे उपलब्ध असलेले अभ्यासक्रम (Courses) CBCS मध्ये घेण्यासाठी |

| | |
|---|---|
| | मार्गदर्शन/प्रोत्साहन दयावे. जेणे करून अधिकाधिक विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल.<br>• CBCS अंतर्गत आंतरविद्या शाखेअंतर्गत विषय देण्यात यावेत व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचे महत्व पटवून दयावे.<br>• विद्यापीठाने सुरू केलेली Credit Transfer Scheme ची माहिती विद्यार्थ्यांना दयावी तसेच त्याचे महत्व समजून सांगावे व ही पध्दत महाविद्यालयामध्ये सुरू करावी. |
| १० | परीक्षेच्या सहज व सुरळित आयोजनाबाबत. |
| | • परीक्षा पध्दतीत होणाऱ्या बदलाची माहिती सर्व प्राचार्य, शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना दयावी. तसेच सदर परीक्षेतील बदल हे विद्यार्थ्यांकरीता करण्यात आले आहेत. असे विद्यार्थ्यांस सांगावे जेणे करून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत राहील.<br>• बेरोजगारीचा खुप मोठा सामाजिक प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष करून उच्च शिक्षित विद्यार्थ्यांमध्ये हा प्रश्न आहे. यास विद्यापीठ व महाविद्यालय जबाबदार आहेत. तेव्हा सर्व शिक्षकांनी सामाजिक जबाबदारीने वागावे, अशी अपेक्षा आहे. याकरीता शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी हितगूज करावी. |
| ११ | आंतरराष्ट्रीय परिषद व कार्यशाळा यांच्या आयोजनाकरिता आर्थिक मदतीबाबत. |
| | • संलग्नित महाविद्यालयामधील संशोधनाचा दर्जा सुधारावा तसेच संशोधनाप्रती आवड निर्माण व्हावी, संशोधन हे दर्जेदार असावे याकरीता विद्यापीठातर्फे MRP करीता ५० लाख रूपये मंजूर केले आहेत. सर्व प्राचार्यांनी सर्व शिक्षकांची बैठक घेवून चांगले प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावेत असे सांगावे.<br>• RGST मध्ये २० पेक्षा कमी प्रस्ताव आले. ज्या शिक्षकांस प्रकल्पाचा पहिल्या हप्ता देण्यात आला त्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र विद्यापीठकडे सादर न केल्याने त्यांना प्रकल्पाचा दुसरा हप्ता देता आला नाही. RGST मध्ये अर्ज करण्याची मुदतीत वाढ करण्यात आली आहे. तरी सर्वांनी परिपूर्ण दर्जेदार प्रस्ताव सादर करावेत.<br>• सर्व प्राचार्यांनी आपल्या शिक्षकांना विद्यापीठ, शासन व इतर संस्थांकडे प्रकल्प सादर करण्यास सांगावे. तसेच ज्या कामाकरीता निधी प्राप्त झाला आहे तो त्याच कामावर खर्च करावा.<br>• विद्यापीठातर्फे प्रस्तावाबाबत पारदर्शक मूल्यमांपन करण्यात येईल.<br>• दरवर्षी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय Workshop, Conference, Seminar आयोजित करण्यात येतात. सदर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय Workshop, Conference, Seminar हे खरच त्या–त्या स्तराचे असल्यास त्याकरीता विद्यापीठातर्फे पन्नास हजार ते दोन लाख रूपयांपर्यंत मदत करण्यात येईल. हा मदतीचा आकडा २० पेक्षा अधिक असेल. |

| | |
|---|---|
| १२ | शिक्षकांची प्रतिनियुक्ती, परीक्षा सहकेंद्र प्रमुख, परीक्षेच्या कामाची कर्तव्ये व कामांबाबत. |
| | ● काही महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य पद भरलेले नाही. प्रभारी प्राचार्यांमार्फत कामकाज करण्यात येते. अपवादात्मक परिस्थितीत सदर कालावधी वाढविण्यात येईल. त्याकरीता सर्व संस्था अध्यक्ष/सचिव यांनी नियमित प्राचार्य पद भरण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी.<br>● महाविद्यालयाने शिक्षकांच्या रिक्त जागा वेळेमध्ये (Time Bond) भरण्याची प्रक्रिया करावी. विद्यापीठामार्फत कमीत कमी वेळेत सर्व प्रक्रिया पुर्ण केली जाईल.<br>● बऱ्याच महाविद्यालयांमध्ये शिक्षकांच्या, प्राचार्यांच्या विविध तक्रारी असतात. त्या तक्रारारींच्या प्रती मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री यांच्या कार्यालयास दिल्या जातात. त्यामुळे संस्थेची, विद्यापीठाची प्रतिमा खराब होते. त्याकरीता सर्व प्राचार्यांनी हया तक्रारी शक्यतोवर कमीत कमी वेळेत आपल्या स्तरावर संपुष्टात आणाव्यात.<br>● बऱ्याच शिक्षकांच्या विद्यापीठातर्फे परीक्षेत सी.एस., जे.एसी.एस., भरारी पथक इत्यादी कामाकरीता नियुक्ती आदेश काढण्यात येतात. त्याप्रसंगी महाविद्यालयाकडून सदर शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात येत नाही. परिणामी परीक्षाकामात अडथळा निर्माण होतो. त्याकरीता जेव्हा विद्यापीठातर्फे ज्या—ज्या शिक्षकांचे नियुक्ती आदेश काढण्यात येतात, त्या शिक्षकांना त्या—त्या कामाकरीता आदेशपत्रातील वेळेकरीता सोडण्यात यावे.<br>● आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांची माहिती पाठविण्याकरीता विद्यापीठातर्फे काढण्यात येणाऱ्या परिपत्रकास महाविद्यालयाकडून चांगला प्रतिसाद मिळत नाही. विद्यापीठाच्या परिपत्रकास प्रतिसाद देण्यात यावा.<br>● काही महाविद्यालयांमध्ये परीक्षा हया चांगल्या होतात. तर काही महाविद्यालयांमध्ये परीक्षामध्ये काही गैरप्रकार होत आहेत. ज्या महाविद्यालयांमध्ये असे गैरप्रकार होत आहेत त्या महाविद्यालयांचे परीक्षा केंद्र काढण्यात येईल. हया गैरप्रकारामुळे विद्यापीठाची प्रतिमा खराब होत आहे. तरी सर्व प्राचार्यांनी परीक्षा हया चांगल्याप्रकारे घ्याव्यात. |
| १३ | महाविद्यालयांच्या स्वायत्ततेबाबत. |
| | ● स्वायत्ताबाबत अशी चुकीची धारणा आहे की, स्वायत्ता आली म्हणजे निधी कमी करण्यात येतो. परंतू, तसे नसून निधी कमी न होता तो अधिक वाढून येतो. तसेच महाराष्ट्र शासनाच्या नवीन जी.आर. मुळे मुंबई विद्यापीठातील २७ महाविद्यालयांनी स्वायत्ताकरीता अर्ज केला असता त्यातील २६ महाविद्यालयांस स्वायत्ता प्रदान करण्यात आली आहे. सद्यस्थितीत मुंबई विद्यापीठात ८९ महाविद्यालय स्वायत्त आहेत. देशाचा विचार केला असता दक्षिणेकडील राज्यात स्वायत्ता महाविद्यालयांची |

| | |
|---|---|
| | संख्या जास्त आहे व त्यांना युजीसी व इतर संस्थांकडून मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होत आहे.<br>• आपल्या विद्यापीठातील पात्र महाविद्यालयांनी स्वायत्ताकरीता अर्ज सादर करावेत.<br>• मा. कुलगुरू महोदयांनी Cluster College ची संकल्पना, महत्व व उपयोगिता यावर भाष्य केले व त्याचे Implementation येणा—या शैक्षणिक वर्षापासून होईल, असे म्हणाले. यामध्ये एक Lead College असेल त्याचा उपयोग संशोधन, अध्ययन, Extension साठी करावा असे आवाहन केले. Cluster College चा उपयोग परीक्षा घेण्यासाठी सुध्दा करावा. |

यानंतर उपस्थितांनी काही प्रश्न विचारले.

घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षकांचे वेतन थांबले आहे.

याबाबत मा. कुलगुरू महोदयांनी असे सांगितले की, सहसंचालक कार्यालय, नांदेड यांनी असे सांगितले आहे की, पात्रता पूर्ण असणाऱ्या शिक्षकांना Approval देण्यात येईल. ३० तारखेच्या बैठकीत काही निकाल निघण्याची शक्यता आहे.

**सुनिल गोजगेमवार, पानसरे महाविद्यापीठ, अर्जापूर**

यांनी शिक्षणाचा दर्जा खालवला असून प्राचार्य पदाकरीता ०८—०९ उमेदवारांनी अर्ज केला असता त्यांना त्यांच्या पीएच.डी. विषयातील माहिती नसल्याचे मुलाखतीमध्ये दिसून आल्याचे सांगून प्राचार्य, शिक्षक यांनी मुख्यालयी राहण्याबाबत काही नियमावली आहे का असे? नमूद करून मा. कुलगुरू महोदयांनी केलेल्या मार्गदर्शनाबदल आभार मानले.

**प्राचार्य डॉ. अवस्थी, रेणापूर महाविद्यालय, रेणापूर**

आरक्षण बाबत विचारणा केली.

याबाबत मा. कुलगुरू महोदयांनी असे सांगितले की, विद्यापीठाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत ०८ दिवसांत कार्यवाही पूर्ण केली जाते. सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या दोन जी.आर. मुळे कामकाज थांबलेले आहे. जर महाराष्ट्र शासनाने प्रक्रिया पुर्ववत करावी असे आदेशित केले असेल तर प्रक्रिया पुर्ववत करण्यात येईल. यावर **डॉ. दिपक बच्चेवार, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रस्तूत विद्यापीठ** यांनी असे सूचित केले की, ज्या पदांच्या आरक्षणामुळे इतर पदांवर फरक पडणार नाही असे विद्यापीठाकडून लिहून आणा असे औरंगाबाद मधील कार्यालयाने सांगितले. बऱ्याच महाविद्यालयांमध्ये ०१—०१ पदांसाठी कोणते रिझर्व्हेशन असते. नवीन जी.आर. काढून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. मुगळे**

B.Ed., M.Ed. करीता कोणते मानांकन वापरावे याबाबत संभ्रम आहे.

सद्यस्थितीत आपण NAAC मानांकन कडे जावे, तत्पुर्वी आपल्या महाविद्यालयास LIC कमिटी पाठविण्यात येईल. त्यांच्याकडून सविस्तर मार्गदर्शन घ्यावे. तसेच आपल्या सकारात्मक दृष्टिकोनाचे व करीत असलेल्या कार्याचे स्वागत.

**श्री. गोविंद घार, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रस्तूत विद्यापीठ**

एन.एस.एस. योजनेअंतर्गत ०१ ते ०२ कोटी रूपये दरवर्षी जमा करून विद्यापीठातर्फे ०८–१० गावे दत्तक घ्यावीत व त्या गावातील अल्पभुधारक, कोरडवाहू शेतकऱ्यांना मदत करावी.

लालबहादूर शास्त्री शेतकरी मदत योजना सुरू करावी.

**डॉ. पी. एन. सगर, मा. अधिसभा सदस्य, प्रस्तूत विद्यापीठ**

शिक्षक तासीका घेतात की नाही हे पाहण्याकरीता विद्यार्थ्यांची उपस्थिती घ्यावी तसेच दैनंदिनी हया LIC कमिटीच्या भेटी प्रसंगी तपासण्यात याव्यात तसेच LIC कमिटीला त्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार दयावेत.

शैक्षणिक दर्जा वाढविण्याकरीता स्वायत्त महाविद्यालयांची संख्या वाढविण्यात यावी. आपल्या विद्यापीठात राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर हे एकच स्वायत्त महाविद्यालय आहे.

महाविद्यालयास नॅक कमिटी भेटीच्या प्रसंगी विद्यापीठाचा एक प्रतिनिधी पाठविण्यात यावा. याप्रसंगी मा.प्र–कुलगुरू महोदयांनी सांगितले की, यापुर्वी पासून महाविद्यालयाने नॅक भेटीचा दिनांक विद्यापीठास कळविल्यास त्याप्रमाणे विद्यापीठाचा प्रतिनिधीच नव्हे तर नॅक समन्वयक यांनी देखील बऱ्याच महाविद्यालयास भेटी दिल्या आहेत.

**डॉ. संग्राम मोरे, भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी**

नॅक करण्याकरीता जास्तीच्या असलेल्या फिसबाबत विद्यापीठातर्फे पत्रव्यवहार करावा जेणेकरून फिस कमी होईल.

दत्तक गाव तीन वर्षासाठी घेतांना महाविद्यालयास त्या जिल्हयातील कोणतेही गाव घेण्यास परवागनी असावी.

याबाबत मा. कुलगुरू महोदयांनी असे सांगितले की, फिस अनुषंगाने पत्रव्यवहार करण्यात येईल. तसेच यापुर्वी दत्तक गावाबाबत असलेल्या २० किलोमीटर ची अट ही महाविद्यालयाचे कामकाज सुरळीतपणे होण्याच्या दृष्टिने आहे.

**डॉ. मदनमोहन सिंग, शरदचंद्र पवार विधी महाविद्यालय, नांदेड**

विधी महाविद्यालयांचे प्रवेश हे विधी सीईटी मार्फत होत आहेत. दिनांक २५/११/२०१९ पर्यत प्रवेश झाले आहेत व परीक्षा ही दिनांक १७/१२/२०१९ पासून सुरू होत आहेत. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना एक सेमीस्टर पुढे वाढवून देण्यात यावेत. त्यांची परीक्षा एप्रिल मध्ये घेण्यात यावी. जो विद्यार्थी एलएल.बी. च्या एकाही

सेमीस्टरमध्ये नापास झाला नाही त्यास JNU ला जाता येते अन्यथा तीन वर्ष प्रॅक्टीस करावी लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे तीन वर्ष नुकसान होते.

**डॉ. संजय जगताप, इंदिरा गांधी महाविद्यालय, वसरणी**

परीक्षा सेंटर बदलामुळे आमच्या महाविद्यालयास १२०० इतर ०३ महाविद्यालयाचे विद्यार्थी परीक्षेसाठी आले आहेत एवढया विद्यार्थ्यांकरीता भौतिक सुविधा या महाविद्यालयाकडे नव्हती तरी एकाच महाविद्यालयाचे विद्यार्थी परीक्षेकरीता पाठविण्यात यावेत.

**डॉ. विठ्ठल घुगे, इंदिरा गांधी महाविद्यालय, वसरणी**

परीक्षेचे मागील बिले अद्याप मिळालेली नाहीत.

मागील परीक्षेची बिले सर्व महाविद्यालयास ही दि. ३१ डिसेंबर पर्यंत देण्यात येतील असे सांगण्यात आले.

**डॉ. राम बोरगावकर, सरस्वती संगित महाविद्यालय, लातूर**

महाविद्यालयांचे परीक्षा सेंटर बदलत असतांना प्राचार्यांची देखील बदलण्यात यावेत.

**डॉ. बालाजी कांबळे, बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर**

आमच्या महाविद्यालयाचे नॅक झाले असून महाविद्यालयांने कायम संलग्निकरणाकरीता प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर केला असून महाविद्यालयाकडे ०१ एकर जमिन असल्यामुळे सदर कायम संलग्निकरणाचा प्रस्ताव थांबला आहे. सद्यस्थितीत लातूर जिल्हयात जमिनीचे दर हे खुप जास्त आहेत. त्यामुळे आमच्या महाविद्यालयास नॅक किंवा इतर संस्थाकडून कोणताही निधी मिळविण्यात अडचण निर्माण होत आहे. तरी कृपया आम्हाला विशेष बाब म्हणून आमच्या महाविद्यालयास ०१ एकर जमिनीची अट रद्द करून कायम संलग्निकरण देण्यात यावेत.

**डॉ. मोहन व्ही. बुके, VDF School of Engineering and Technology, Latur**

विद्यापीठात दरवर्षी विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी हे विविध शांखाची पदवी प्राप्त करतात. पण त्यांना म्हणावा तसा रोजगार त्या—त्या प्रमाणात मिळत नाही. त्याकरीता विद्यापीठाने दरवर्षी वेगवेगळया कंपन्यांना बोलावण्यात यावे जेणे करून विद्यार्थ्यांचे Placement मोठया प्रमाणात होतील.

**डॉ. दिपक बच्चेवार, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रस्तुत विद्यापीठ**

बऱ्याच प्रसंगी शिक्षकांना परीक्षा अनुषंगाने कामकाजासाठी नियुक्ती आदेश विद्यापीठातर्फे देण्यात येतात. परंतू, महाविद्यालयांतील परीक्षा अनुषंगाने कामकाज करण्याकरीता महाविद्यालयांने त्या—त्या शिक्षकांना नियुक्ती आदेश अगोदरच दिलेले असतात व ते त्याकामामध्ये व्यस्त असतात. त्याप्रसंगी काय करावे. याप्रसंगी परिस्थिती पाहून कार्यवाही करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

**डॉ. बी. टी. पवार, मा. अधिसभा सदस्य, प्रस्तूत विद्यापीठ**

पीएच.डी. संशोधन मार्गदर्शकाबाबत विचारणा केली. तसेच D-CAP चे मागील बील मिळालेले नाहीत.

याबाबत मा. कुलगुरू महोदयांनी असे सांगितले की, पीएच.डी. संशोधन केंद्राकरीता आवश्यक असलेले निकष महाविद्यालय पूर्ण करीत असतील तर त्या—त्या महाविद्यालयांस पीएच.डी. संशोधन केंद्र देण्यात येतील. बीलाबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

उक्त विविध विषयांबाबत सर्व प्राचार्यांनी महाविद्यालयात बैठक आयोजित करून सर्व शिक्षकांना याची माहिती दयावी, असे मा. कुलगुरू महोदयांनी सर्व उपस्थितांना सूचित केले.

यानंतर मा. प्र—कुलगुरू डॉ. जे. एम. बिसेन यांनी आजची बैठक ही संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आली असून ज्या काही विधायक सूचना करण्यात आपल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल असे सांगितले. त्याचबरोबर खालीलप्रमाणे सर्वांना सूचित केले.

१. विद्यापीठातर्फे प्रसिध्द करण्यात आलेल्या पत्रास/परिपत्रकास महाविद्यालयांकडून चांगला प्रतिसाद मिळत नाही, तो सर्व महाविद्यालयांनी विद्यापीठ पत्रास/परिपत्रकास प्रतिसाद दयावा.
२. परीक्षा कामामध्ये शिक्षकांनी योग्य तो प्रतिसाद दयावा, जेणे
३. करून निकाल वेळेवर व अचूक लागण्यास मदत होईल.
४. विद्यापीठातर्फे सर्व महाविद्यालयांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आले असून ज्या महाविद्यालयांनी पदवी प्रदान कार्यक्रम अद्याप घेतलेला नाही त्यानी तो लवकरात लवकर घ्यावा असे सांगितले.
५. कॅस संदर्भात सर्व शिक्षकांनी/महाविद्यालयांनी कॅस करीता प्रस्ताव सादर करावेत. ०६ महिन्यांनी कॅप आयोजन होत असल्याने प्रस्तावाची संख्या मोठी होत आहेत. त्यामध्ये सुधारणा होण्याकरीता दरमहा किंवा ०२ महिन्यानी कॅप आयोजन अनुषंगाने निर्णयाकरीता विषय सादर करण्यात आला आहे.
६. परीक्षेतील गैरप्रकारबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम—२०१६ मधील कलम 48(5)(a) नुसार कार्यवाही होईल, करीता सर्व शिक्षक, प्राचार्य यांनी आपापली परीक्षा अनुषंगाने कामकाज जबाबदारीने करावीत, असे सूचविले.
७. विद्यापीठाचे कामकाज हे मोठया व सामूहिक स्वरूपाचे असून सर्वांनी योग्य दिशेने ते केले पाहिजे असे नमूद करून सर्वांनी कामकाज योग्य पध्दतीने करण्यास सूचविले.

यानंतर मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ यांनी विद्यापीठाचा विद्यार्थी हा केंद्र बिंदू तर शिक्षक हा मानबिंदू आहे असे नमूद केले. तसेच पुढील काही दिवसांत उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करून उत्तपुस्तिका केंद्रीय मुल्यांकन केंद्रास पाठविण्याकरीता सर्वांना सूचित करून सर्व उपस्थितांचे आभार मानले.